**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन

- होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत, सुलभतेनं आणि वेगानं पोहोचवण्यासाठी इराणची सहमती

- नेपाळमधे माजी प्रधानमंत्री आणि गृहमंत्र्यांना अटक

- यंदाच्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ/ पहिला सामना बंगळुरूमधे 'सनरायझर्स हैदराबाद' आणि 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांच्यात रंगणार

**आणि**

- देशाच्या विविध भागात वादळी पावसाची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशातल्या गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातल्या जेवर इथं नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन केलं. देशातला सर्वात मोठा प्रदेश आज देशातल्या सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विमानतळ असणाऱ्या राज्यांपैकी एक झाला आहे, असं प्रतिपादन मोदी यांनी केले. हा विमानतळ उत्तर प्रदेशचे शेतकरी, लघु आणि मध्यम उद्योजक तसंच युवकांना नव्या संधी घेऊ येणार आहे. असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.
पश्चिम आशियातील युद्धाविषयीदेखील प्रधानमंत्र्यांनी भाष्य केले…

**(होल्ड बाईट प्रधानमंत्री)**

नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ सुमारे ११ हजार २०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणार असून हा देशातल्या सर्वात मोठ्या ग्रीनफील्ड विमानतळ

प्रकल्पांपैकी एक आहे. पहिल्या टप्प्यात विमानतळाची दरवर्षी सुमारे १ कोटी २० लाख प्रवाशांची क्षमता असेल. ती भविष्यात सुमारे ७ कोटी वार्षिक प्रवाशांपर्यंत वाढू शकेल.

<><><><>

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत सुलभतेने आणि वेगाने पोहोचवण्यासाठी इराणने सहमती दर्शवली आहे. जागतिक पुरवठा साखळीत ही सामुद्रधुनी  महत्त्वाचा मार्ग असून तिथं  मानवतावादी मदत आणि कृषी मालाची वाहतूक करू देण्याची संयुक्त राष्ट्रांची विनंती तेहरानने स्वीकारली आहे. संयुक्त राष्ट्रांमधे इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी  ही माहिती दिली.  इराणच्या अणुउर्जा प्रकल्पांवर हल्ले होत असतानाही ही विनंती मान्य केल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान भारताची दोन तेलवाहू जहाजं आज होर्मुझची सामुद्रधुनी पार करणार आहेत. भारतीय नौदलाच्या युद्धनौका त्यांच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

<><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष आता अधिक तीव्र झाला असून यात येमेनच्या हुथी बंडखोरांनी अधिकृतपणे प्रवेश केला आहे. २०१४ पासून येमेनची राजधानी आपल्या ताब्यात ठेवणाऱ्या या बंडखोरांनी आज पहाटे इस्त्रायलच्या दिशेनं पहिलं क्षेपणास्त्र डागलं. ओमानमधल्या सलालाह बंदरावर झालेल्या मानव विरहीत ड्रोन हल्ल्यात एक मजूर जखमी झाला आहे. ओमानच्या सरकारनं या हल्ल्याचा निषेध केला आहे. इस्त्रायलनं लेबाननची राजधानी बैरूत आणि दक्षिण भागात हिजबुल्लाच्या तळांवर भीषण हल्ले केले. त्यात अनेक नागरिक ठार झाले . इस्त्रायलवर डागलेली बहुतांश क्षेपणास्त्रं आणि ड्रोन त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेनं हवेतच नष्ट केली आहेत.

<><><><>

इराण युद्ध संपल्यानंतर सौदी अरेबिया आणि इस्त्राईल या दोन्ही देशांनी परस्परांमधले संबंध सुरळीत करण्याची गरज आहे, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मायामी इथल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. ट्रम्प त्यांच्या 'अब्राहम करारा अंतर्गत' या दोन्ही शक्तिशाली देशांवर संबंध सुधारण्यासाठी गेली अनेक वर्षं दबाव आणत आहेत. इस्त्राईल सोबत राजकीय आणि व्यावसायिक संबंध सामान्य करण्याआधी पॅलेस्टिनशी संबंध दृढ करण्याकडे सौदी अरेबियाचा कल असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><>

विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं आणलेल्या पी एम ई ड्राईव्ह योजनेच्या निकषांमधे केंद्रसरकारने बदल केला आहे. आता ३१ जुलै २०२६ पर्यंत नोंदणी झालेल्या दुचाकी आणि ३१ मार्च पर्यंत नोंदणी झालेल्या इलेक्ट्रिक रिक्षा आणि ढकलगाड्यांना 'ही' प्रोत्साहनपर सूट मिळेल. प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकींची कमाल किंमत मर्यादा दीड लाख रुपये तर रिक्षांची कमाल किंमत मर्यादा अडीच लाख इतकी ठेवण्यात आली आहे.

<><><><>

नेपाळमधे माजी प्रधानमंत्री 'केपी शर्मा ओली' आणि माजी गृहमंत्री 'रमेश लेखक' यांना आज सकाळी अटक करण्यात आली. गेल्या वर्षी नेपाळमधे तत्कालीन सरकारविरोधातल्या निदर्शनांवरच्या कारवाईमधे अनेक तरुण निदर्शकांचा मृत्यू झाला होता. त्यासंदर्भात नेमलेल्या चौकशीसमितीने ओली आणि लेखक यांना जबाबदार धरलं आहे. नेपाळचे नवनिर्वाचित प्रधानमंत्री बालेंद्र शाह यांच्या अध्यक्षतेखाली काल काठमांडू इथं झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला. ओली आणि लेखक या दोघांनाही उद्या न्यायालयात हजर केलं जाईल.

<><><><>

१९ वी इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. संध्याकाळी बंगळुरू इथं उद्घाटनाचा सामना एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये होणार आहे. गेल्या वर्षी बंगळुरूमधेच आयपीएलच्या विजय सोहळ्याच्या वेळी क्रिकेटशौकिनांच्या गर्दीत चेंगराचेंगरी झाल्यानं ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्याप्रति संवेदना व्यक्त करण्याच्या उद्देशाने यंदा प्रथेनुसार उद्घाटन सोहळा होणार नाही असं बीसीसीआयने जाहीर केलं आहे. या ११ जणांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी प्रेक्षागृहातली ११ आसनं पूर्ण स्पर्धेसाठी रिकामी ठेवण्यात येतील. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. मुंबईच्या वानखेडे मैदानावर उद्या मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांची लढत होईल.

<><><><>

बँकॉक इथं आशिया कप जागतिक मानांकन स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारतानं तिरंदाजीमध्ये दोन सुवर्ण, चार रौप्य आणि चार कांस्यपदकांसह एकूण १० पदकं जिंकली, यामध्ये कंपाऊंड प्रकारात मिश्र सांघिक सुवर्णपदक आणि पुरुषांच्या वैयक्तिक गटातील सर्व पदकांचा समावेश आहे.

<><><><>

मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत इटलीच्या यानिक सिनरने जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव याला हरवत अंतिम फेरीत धडक दिली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीत सिनरने झ्वेरेव याचा ६-३, ७-६ असा परभाव केला. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात त्याची गाठ चेक प्रजासत्ताकच्या जिरी लेहेकाशी पडेल.

<><><><>

ओडिशाच्या नयागढ जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात चार महिलांसह किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून चाळीस पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत.

हनुमान घाटी इथं काल रात्री हा अपघात झाला. एक खाजगी बस सुमारे साठ प्रवाशांना घेऊन बेरहामपूर इथून हरिशंकर गावाकडे जात होती. चालकाचं बसवर नियंत्रण सुटल्यानं एका खडकावर आदळून ती बस उलटली. अग्निशामक दलाचे जवान आणि आपत्कालीन पोलीस दलाचे कर्मचारी घटनास्थळी तत्काळ दाखल झाले असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. जखमींना जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आलं ,तर १५ गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३२ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात वादळी पावसाची शक्यता असून हवामान विभागाने अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम आणि पश्चिम बंगालमधला हिमालयीन प्रदेश या भागात आज वादळी पाऊस आणि गारपिटीचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. हिमाचल प्रदेश, बंगालमधला मैदानी प्रदेश आणि ओदिशात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता आहे. पंजाब, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, तेलंगण, पश्चिम राजस्थान, आंध्रप्रदेश, केरळ, माहे, दक्षिण कर्नाटक, विदर्भ आणि ईशान्येकडच्या राज्यांमधे येत्या २ दिवसात तुरळक ठिकाणी वादळी पाऊस होऊ शकतो.

**//<><><><><>//**